# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,
पत्रव्यवहाराचा पत्ता: ७ वा मजला, जी.टी. रूग्णालय प्रशासकीय इमारत, मुंबई-४०० ००१
दुरध्वनी क्रं. ०२२ २२६२७९, फॅक्स क्रं. ०२२ २२६२२०८४
संकेतस्थळ: www.mahawssd.gov.in, Email- WSSD_DOs_RPOLICY@maharashtra.gov.in, wssdpapu०७@rediffmail.com

क्र. ग्रापाधो-११११/प्र.क्र.१८५/पापु-७ दि. १७ नोव्हेंबर,२०१२

प्रति,
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद (सर्व)**

**विषय : ग्रामीण पाणी पुरवटा योजनांची अंमलबजावणी करिता ई- निविदा प्रणालीचा वापर करण्याबाबत.**

**संदर्भ :** १)शासन परिपत्रक, पा.पु. व स्व.वि. क्र. ग्रापाधो-११११/प्र. क्र.१८५/पापु-७, दि. २९ फेब्रुवारी,२०१२
२) समक्रंमाकाचे शासनपत्र, दि. २१ सप्टेंबर,२०१२

विषयाधीन प्रकरणी संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये, राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत रू. ५.०० लक्ष व त्यापेक्षा अधिक किंमतीची कामे व रू. १.०० लक्ष वा त्यापेक्षा अधिक मुल्याच्या खरेदीसाठी ई- निविदा प्रणालीचा अवलंब करणे अनिवार्य करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या. संदर्भ क्रं. २ च्या पत्रान्वये, त्यास दि. ३० सप्टेंबर,२०१२ पर्यंत स्थगिती देण्यात आली होती.

राज्यातील आदिवासी, दुर्गम व डोंगराळ भागातील ग्रामपंचायतीच्या ठिकाणी आवश्यक ब्रॉडबॅंड सुविधा उपलब्ध होत नसल्याचे व विद्युत अनुपलब्धतेमुळे ई-निविदा प्रणालीचा अवलंब करण्यास अडचणी निर्माण होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आल्याने, राज्यातील ५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांसाठी ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत रू. ५.०० लक्ष व त्यापेक्षा अधिक किंमतीची कामे व रू. १.०० लक्ष वा त्यापेक्षा अधिक मुल्याच्या खरेदीसाठी दि. ३१ मार्च,२०१३ पर्यंत ई- निविदा प्रणालीचा अवलंब करण्यास सूट देण्यात येत आहे.

त्यानंतर संदर्भाधीन शासन परिपत्रकातील सुचनांनुसार राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करताना रू. ५.०० लक्ष व त्यापेक्षा अधिक किंमतीची कामे व रू. १.०० लक्ष वा त्यापेक्षा अधिक मुल्याच्या साहित्य खरेदीसाठी ई- निवदा प्रणालीचा अवलंब करणे अनिवार्य राहील.

(ल. गो. ढोके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषदा (सर्व)
पापु-७ संग्रहासाठी

D:\JADHAV\CR १८५ ११ nold ३११०१२ - for merge.doc